पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३८**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. ११/१२/२०१७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १५०३**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.सौ.सुनिता वाडेकर, मा.कु.हिमाली कांबळे, मा.सौ.सोनाली लांडगे व मा.सौ.फरजाना शेख यांचे दि. ४/१२/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव साजरा करणेत येतो. सन २०१७ चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव दि. २१.१२.२०१७ ते २५.१२.२०१७ या कालावधीत गणेश कला मंदिर स्वारगेट, पुणे या ठिकाणी साजरा करणेत यावा.

सदर महोत्सवासाठी सन २०१७–२०१८ च्या अंदाजपत्रकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव या अर्थशिर्षकावर र.रू. २०,००,०००/– इतकी तरतुद केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महोत्सवात खालील कार्यक्रमाचा समावेश करणेत यावा.

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कलाकार | र.रू. |
|---|---|---|---|---|
| १. | २१–१२–२०१७ | भीम संध्या | स्वप्निल बांदोडकर, रविंद्र साठे, उत्तरा केळकर, अभिजित कोसंबी हे प्रसिध्द पार्श्वगायक प्रस्तुत २५ कलाकार | ४.५० लाख |
| २. | २२–१२–२०१७ | मी मराठी | नंदेश उमाप प्रस्तुत ७५ ते ८० कलाकार | ३.५० लाख |
| ३ | २३–१२–२०१७ | शिंदेशाही तोडा | वैशाली सामंत, आदर्श शिंदे , १४ सहकलाकार | ४.५० लाख |
| ४ | २४–१२–२०१७ | भीमगीतांचा कार्यक्रम | वैशाली माडे व अभिजित कोसंबी व सहकलाकार | ४.लाख |
| ५ | २५–१२–२०१७ | भीमगीतांचा कार्यक्रम सोनियाची उगवली सकाळ | आनंद शिंदे आणि सह कलाकार | ३.५० लाख |
| | | | एकूण अंदाजे खर्च | २०. लाख |

सांस्कृतिक कार्यक्रमाचे टेंडर न काढता कार्यक्रमात सहभागी कलाकारांना/संस्थांना आर.टी.जी.एस मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता घेण्यात आलेली असून तसा मा.स्थायी समितीचा ठराव पारित झालेला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करणेस व सहभागी कलाकारांना /संस्थांना आर.टी.जी.एस. मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता मिळणेस.

सदर महोत्सवामधील वर्तमानपत्रातील जाहिरात/फ्लेक्स , स्पीकर व्यवस्था , लाईट व्यवस्था, ट्रॉफिज प्रोजेक्टर, फोटो , हार व सजावट इ. सर्व व्यवस्था संबंधित खात्यामार्फत करणेत यावी.

**विषय क्र. १५०४**

मा.सुनिल कांबळे यांचे दि. ६/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३६ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१.०५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७ – १८ चे अंदाजपत्रक, | | |
| १)पान क्र.१८७, अ.क्र.६०२, प्रभाग क्र.३६ ड मध्ये बबन नागपुरेंच्या घरापासून ते बौध्द विहारपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६/एसए१५–१२०२ | १० लाख | --- |
| २)पान क्र.१८७, अ.क्र.६०३, प्रभाग क्र.३६ ड मध्ये आदिशक्ती चौक परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६/एसए१५–१२०३ | १० लाख | --- |
| ३) पान क्र.१८७, अ.क्र.६१४, प्रभाग क्र.३६ ड मध्ये बिबवेवाडी गाव परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६/एसए१५–१२१४ | १० लाख | --- |
| ४)पान क्र.१८७, अ.क्र.६१५, प्रभाग क्र.३६ ड मध्ये पापळवस्ती परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६/एसए१५–१२१५ | १० लाख | --- |
| ५) पान क्र.१७३, अ.क्र.२६५, प्रभाग क्र.३६ ड मध्ये संपूर्ण गंगाधाम परिसरात डीजीटल कर्विंग व इंटर ब्लॉकिंग बसविणे, बजेट कोड – सीई२०अे१०३/एसए१३–५१५ | १० लाख | --- |
| ६) पान क्र.२१८, अ.क्र.११६, प्रभाग क्र.३६ ड मध्ये संगम सोसायटी परिसरातील पावसाळी लाईन टाकणे, बजेट कोड – सीई२०ई१०१/एसएफ१–२१६ | १० लाख | --- |
| ७)पान क्र.१७४, अ.क्र.५१, प्रभाग क्र.३६ ड मध्ये नाल्यालगतचा राडारोडा उचलणे, बजेट कोड – सीई२०अे८८४/एसए१०–१५१ | ५ लाख | --- |
| ८)पान क्र.१८७, अ.क्र.५९७, प्रभाग क्र.३६ ड मध्ये बिबवेवाडी ओटा परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६२/एसए१५–११९७ | १० लाख | --- |
| ९) पान क्र.१७३, अ.क्र.२६६, प्रभाग क्र.३६ ड मध्ये विविध ठिकाणी इंटर ब्लॉकिंग बसविणे, बजेट कोड – सीई२०अे१०३/एसए१३–५१६ | १० लाख | --- |
| १०) पान क्र.१८७, अ.क्र.५९८, प्रभाग क्र.३६ ड मध्ये बिबवेवाडी ओटा अंतर्गत परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६२/एसए१५–११९८ | १० लाख | --- |
| ११) पान क्र.१८७, अ.क्र.६००, प्रभाग क्र.३६ ड मध्ये प्रेमनगर झोपडपट्टी गणपती मंदिर ते बौध्द विहार पर्यंत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, बजेट कोड – सीई२०अे१२६२/एसए१५–१२०० | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र.३६ ड मधील बौध्द विहार ते बबन नागपूरेंच्या घराजवळील रस्ते विकसित करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.३६ ड मधील बिबवेवाडीतील व पापळ वस्तीमधील रस्ते विकसित करणे. | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.३६ ड मध्ये संपूर्ण बिबवेवाडी परिसरात डिजिटल कर्विंग व इंटर ब्लॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.३६ ड मध्ये बिबवेवाडी परिसरातील विविध ठिकाणच्या पावसाळी लाईन टाकणे | --- | १५ लाख |
| ५) प्रभाग क्र.३६ ड मधील बिबवेवाडी ओटा परिसरात रस्ते विकसित करणे व विविध ठिकाणी इंटर ब्लॉकींग बसविणे | --- | २० लाख |
| ६) प्रभाग क्र.३६ ड मधील बिबवेवाडी ओटा अंतर्गत परिसरातील रस्ते विकसित करुन ब्लॉक बसविणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १५०५**

मा.सौ.मंजुषा खर्डेकर यांचे दि. ६/१२/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ क मधील १) बिंदू माधव ठाकरे दवाखाना २) एरंडवणा दवाखाना व इतर मनपा दवाखाने, रुग्णालये यांमध्ये वैद्यकिय उपकरणे, कंज्युमेबल्स खरेदी करणेसाठी र.रुपये ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,<br>१) ४.झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, ४.ब.महिला बाल कल्याण योजना, पान क्र.१३८, अ.क्र.१४, महिला बाल कल्याण योजना अंतर्गत करावयाची कामे, (यादी क्र.एसएम १), पान क्र. २६५, अ.क्र.२, प्रभाग क्र. १३ क मधील बचतगटासाठी रोजगार निर्मिती करणे | १० लाख | --- |
| २) १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध | | |

| | | |
|---|---|---|
| उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एसयु १), पान क्र. २५४, अ.क्र. ५८, प्रभाग क्र. १३ क मध्ये नाना-नानी पार्क करणे<br>३) बजेट कोड नं. सीई१७अे२४२/एसजे६-४९ अन्वये प्रभाग क्र. १३ क मध्ये मोबाईल पॅथॉलॉजी लॅब करणे व जेनेरिक औषध केंद्र करणे | १० लाख<br><br>१० लाख | ---<br><br>--- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १३ क मधील १) बिंदू माधव ठाकरे दवाखाना २) एरंडवणा दवाखाना व इतर मनपा दवाखाने, रुग्णालये यांमध्ये वैद्यकिय उपकरणे, कंज्युमेबल्स खरेदी करणे | --- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १५०६**

दि. ६/११/२०१७ ते दि. १२/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/५८० दि.३०/११/२०१७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १५०७**

दि. १३/११/२०१७ ते दि. १९/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/५८१ दि.३०/११/२०१७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १५०८**

दि. ३०/१०/२०१७ ते दि. ५/११/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/५८२ दि.३०/११/२०१७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. १५०९**

पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये खात्यामार्फत डांबरी रस्त्याची कामे करणेसाठी पथ विभागास पेव्हर मशिन पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.त्रिमुर्ती स्टोन मेटल कं. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.३१,२४,५००/- पेक्षा १४.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,९२,८६२=५५ पैकी उपलब्ध तरतूदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५८३ दि. ३०/११/२०१७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १५१०**

मा.प्रमोद उर्फ नाना भानगिरे, मा.सुनिल कांबळे व मा.अविनाश बागवे यांचे दि. २०/६/२०१७ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने काढलेल्या सी.एफ.सी. च्या निविदेत अनेक त्रुटी आहेत. कमी दर आलेल्या ठेकेदाराला यामध्ये डावलले जात आहे.

त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र. २२७९ दि. २७/१२/२०१६ चा फेरविचार करावा.

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.७/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५११**

मा.किरण दगडे पाटील यांचे दि. २८/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक-क, यादी क्र. एसपी२, पान नं.३४, अ.क्र.१८०, प्रभाग क्र. १० अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे बजेट कोड- झेडई१६अे१०४/एसआर२-६८० | २० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र. १० अ बावधन येथील स्मशानभूमीसाठी वॉचमन कोठी बांधणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १० अ कुंबरे टाऊनशिप परिसरात व विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५१२**

प्रभाग क्र. ८ मधील औंध येथील रामचंद्र गायकवाड रस्त्यावरील शीतल अपार्टमेंट (महादजी शिंदे रस्ता व रामचंद्र गायकवाड रस्ता टी जंक्शन) ते आंबेडकर चौक हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१०(१)(अ) अन्वये २४ मीटर ऐवजी ३० मीटर रुंदीचा आखण्याबाबत मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. २८/८/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१४ दि. २९/८/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/भूसंपादन/५४२ दि. २३/११/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५१३**

मा.शंकर पवार यांचे दि. २१/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३०ड ,मधील नागरिकांचे सांसर्गिक/असंसार्गिक रोगांवर उपाययोजना अंतर्गत जनजागृती व आरोग्य तपासणी करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह उभारणे व विविध विकास कामे करणे. पान क्र.२४८, अ.क्र.२७, सिंहगड रोड वीर बाजी पासलकर स्मारक येथे समूह संस्कार शिल्प बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.३०ड ,मधील नागरिकांचे सांसर्गिक/असंसार्गिक रोगांवर उपाययोजना अंतर्गत जनजागृती व आरोग्य तपासणी करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५१४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४१३ दि.२७/९/२०१७ चे पत्र.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भांकित क्र. ९ मा. स्थायी समिती ठ.क्र. २२७६, दि.२७/१२/२०१६ प्रमाणे कार्यवाही करणेस.
२. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली ८६ प्रकरणे व त्यांची माहे सप्टेंबर २०१७ अखेर रक्कम रुपये १४,९६,८४,४०५/- निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५१५**

पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/४५७,दि.१६.१०.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १४८ दि.२२/११/२०१७ विचारासाठी.

१. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग, शिक्षण विभाग, भवन रचना विभाग व रेनबो फाउंडेशन, १-१-७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद-५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने ६ ते १८ वयोगटातील पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणेस.

२. पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग मार्फत शाळांच्या मोकळ्या वर्ग खोल्या, बंद पडलेल्या शाळा दिवस-रात्र निवारा प्रकल्प करीता उपलब्ध करून देणेस.

३. पुणे महानगरपालिका भवन रचना विभागामार्फत दिवस-रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता वर्ग खोल्यांचे नुतनीकरण करणे, इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा व तद्नुषंगिक सोयी, सुविधा उपलब्ध करणेस.

४. रेनबो फाउंडेशन,१-१-७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद-५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी पुणे यांचे समवेत ५ वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस.

५. रस्त्यावरील मुलांकरीता दिवस-रात्र निवारा करीता O&M cost उपलब्ध होणेसाठी मे. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस. दिवस-रात्र निवारा करीता O&M cost ला मान्यता मिळेपर्यंतचा संपूर्ण खर्च पुणे महानगरपालिका कडील उपलब्ध तरतूदमधून (FE14C208 – पुणे शहरातील रस्त्यांवरील मुलांकरीता मोबईल स्कूल सुरू करणे र.रू. १०.०० कोटी) करणेस.

६. सदर प्रकल्पाच्या व्यवस्थापन करीता मे. राज्य शासनाकडून तरतूद उपलब्ध न झाल्यास पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी तरतूद उपलब्ध करणेस व त्यामधून खर्च करणेस.

७.बजाज फिनसर्व कंपनी – कंपनी सोशल रिसपॉन्सिबिलिटी ॲक्ट अंतर्गत बजाज फिनसर्व कंपनीमार्फत विद्यार्थ्यांकरीता दिवस-रात्र निवारा उपलब्ध करणे अंतर्गत खर्च करणेस. या बाबतचा तपशिल या विषयक करणेत येणाऱ्या करारनामामध्ये दर्शविणेत आला आहे. सदर प्रकल्पासाठी सी.एस.आर. अंतर्गत उपलब्ध करून देणेत आलेली तरतूद व कार्याचा दरमहा अहवाल संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेकडे सादर करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/१२/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १५१६**

पुणे पेठ कोथरुड स.नं. ८७/७ अ चे मिळकतीचे बक्षिसपत्र पुणे मनपास लिहून देणेस श्री.रामचंद्र नाना सुतार यांचे वारस तयार नसल्याने सदर क्षेत्र पुणे मनपाचे नावे मालकी हक्काने प्राप्त करुन घेणेकरीता प्राप्त कायदेशीर अभिप्रायानुसार मूळ मालक यांचे विरुध्द पार्ट परफॉर्मन्सचा दावा दिवाणी न्यायालयात दाखल करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/५७८ दि.३०/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १५१७**

बर्मिंगहॅम सिटी काऊन्सिल यांचेसह पुणे महानगरपालिकेचा सामंजस्य करार करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/५८८ दि.२/१२/२०१७ चे पत्र.

१)बर्मिंगहॅम सिटी काऊन्सिल यांचेसह महानगरपालिके सोबतची अन्न व पोषण/पोषक आहार यासंबंधीच्या स्मार्ट धोरणांकरिता पुणे महानगरपालिकेचा सामंजस्य करार करणेस

२) तसेच सदर करारनाम्याशी संबंधित कार्य राबविणेबाबत इतर अनुषंगिक बाबींचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

३) मा.महापालिका आयुक्त यांना सामंजस्य करारारावर स्वाक्षरीचे अधिकार देणेस

**विषय क्र. १५१८**

पुणे महानगरपालिकेचे छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रोड, पुणे येथील मत्सालयाचे प्रवेश शुल्कात वाढ करुन प्रौढांस रुपये २०/- व लहानांस रुपये १०/- आकारण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/५९१ दि.४/१२/२०१७ चे पत्र.

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**